ई-मेल - agristat.१०४१@gmail.com
Fax - ०२०-२६१२६१७३,
दुरध्वनी क्र.०२०-२६१२१०४१

जा. क्र.सां ८/प्रमंपिवियो/३३४/२०१६
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००१ दि : २९ जुलै, २०१६

प्रति,

१. जिल्हाधिकारी (सर्व)
२. विभागीय कृषि सहसंचालक, (सर्व)
३. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
४. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
५. विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी मुंबई-४०० ०२३.
६. व्यवस्थापक, रिलायंस जनरल इन्शुरन्स कंपनी लि, मुंबई-४०००६३.
७. व्यवस्थापक, इफ्को टोकिओ जनरल इंशुरंस कं. लि.,
८. व्यवस्थापक, एच.डी.एफ.सी. इर्गो जनरल इंशुरंस कं. लि.,

विषय : प्रधानमंत्री पीकविमा योजना खरीप हंगाम २०१६ करिता नुकसान पंचनामा कार्यपध्दती.

संदर्भ : १. शासन निर्णय क्र प्रपिवियो/प्रक्र९७/११अे, दिनांक ५ जुलै, २०१६
२. शासन निर्णय क्र प्रपिवियो पुरक/प्रक्र९७/११अे, दिनांक १६ जुलै, २०१६

उपरोक्त संदर्भान्वये प्रधानमंत्री पीकविमा योजना खरीप हंगाम २०१६ मध्ये राज्यातील अधिसुचित क्षेत्रातील अधिसुचित पिकांकरिता राबविणेत येत आहे.

या योजनेअंतर्गत येणाऱ्या विमा संरक्षणाच्या बाबी जसे, स्थानिक नैसर्गिक आपत्ती (पुराचे पाणी शेतात शिरुन पिकाचे झालेले नुकसान, गारपीट, भुस्खलन) व काढणी पश्चात नुकसान (चक्रीवादळ, अवकाळी पाऊस) यामुळे नुकसान झाल्यास होणारी नुकसान निश्चिती करणेकरिता पंचनामा कार्यपध्दती पुढीलप्रमाणे.

**नुकसान पंचनामा कार्यपध्दती :**

१. राज्यात खरीप हंगाम २०१६ पासून शासन निर्णय क्र प्रपिवियो/प्रक्र९७/११अे, दिनांक ५ जुलै, २०१६ व शासन निर्णय क्र प्रपिवियो पुरक/प्रक्र९७/११अे, दिनांक १६ जुलै, २०१६ अन्वये प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत येणाऱ्या स्थानिक नैसर्गिक आपत्ती व काढणी पश्चात नुकसान या विमा संरक्षणाच्या बाबींमध्ये वैयक्तिक स्तरावर पंचनामे करुन विमा कंपनीने महसुल विभाग व कृषि विभागाच्या मदतीने नुकसान भरपाई निश्चित करावयाची आहे.

२. **पीक नुकसानीची माहिती कळविण्याची पध्दत :**

योजनेत सहभागी शेतकऱ्यांनी घटना घडल्यापासून ४८ तासांच्या आत याबाबतची सुचना दिनांक, वेळ, नुकसानीचे कारण, प्रकार, प्रमाण व सर्व्हे नं. सहित विमा कंपनी, संबंधीत बँक, कृषि / महसूल विभाग किंवा टोल फ्री नंबर द्वारा देण्यात यावी. सर्वप्रथम विमा कंपनीचे खाली नमुद केंद्रीय टोल फ्री क्रमांकाचा वापर करण्यात यावा.

| जिल्हा समुह क्र | समाविष्ट जिल्हे | विमा कंपनीचे नाव व पत्ता |
|---|---|---|
| १ | लातुर, अकोला, हिंगोली, सांगली, ठाणे, पालघर<br>(६ जिल्हे) | १ अकोला, लातुर व हिंगोली - इफको टोकीयो जनरल इन्शुरन्स कंपनी लि. , २रा मजला, अकाश टॉवर्स, टिळक रोड, अकोला-४४४००१, दुरध्वनी क्र. ०७२४-२४२४८०३,२४२४८०८ टोल फ्री-१८००१०३५४९९<br>२ सांगली- - इफको टोकीयो जनरल इन्शुरन्स कंपनी लि. ,१०२ १ ला मजला जॉजू आरकेड, दामिनी हॉटेल जवळ, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००१, दुरध्वनी क्र. ०२३१- |

| जिल्हा समुह क्र | समाविष्ट जिल्हे | विमा कंपनीचे नाव व पत्ता |
|---|---|---|
| | | ६६१८७१७, ०२३१-६१८७७२. टोल फ्री-१८००१०३५४९९<br>३.ठाणे व पालघर- इफको टोकीयो जनरल इन्शुरन्स कंपनी लि., ३रा मजला ,ट्रायटन ड्रिम्स बिल्डिंग, चेव्होरलेट, ठाणे (पश्चिम) मुंबई-४०११०१<br>दुरध्वनी क्र ०२२-२५३९६०४४/२५३९६०३९ टोल फ्री क्र १८००१०३५४४९९ |
| २ | उस्मानाबाद, नांदेड, औरंगाबाद, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रायगड<br>(६ जिल्हे) | भारतीय कृषि विमा कंपनी लि., मुंबई क्षेत्रीय कार्यालय, स्टॉक एक्सचेन्ज टॉवर्स, २० वा मजला, पुर्व खंड, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४०००२३.<br>दुरध्वनी क्र ०२२-६१७१०९०० /६१७१०९०१<br>फॅक्स क्र. ०२२-६१७१०९१५<br>टोल फ्री क्र १८००१०३००६१ |
| ३ | जालना, जळगाव, वाशीम, सोलापूर, भंडारा, सातारा<br>(६ जिल्हे) | भारतीय कृषि विमा कंपनी लि., मुंबई क्षेत्रीय कार्यालय, स्टॉक एक्सचेन्ज टॉवर्स, २० वा मजला, पुर्व खंड, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४०००२३.<br>दुरध्वनी क्र ०२२-६१७१०९०० /६१७१०९०१<br>फॅक्स क्र. ०२२-६१७१०९१५<br>टोल फ्री क्र १८००१०३००६१ |
| ४ | परभणी, अमरावती, वर्धा, धुळे, गडचिरोली, गोंदिया<br>(६ जिल्हे) | रिलायंस जनरल इन्शुरन्स कंपनी लि. वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, ५ वा मजला, चिंतामणी अव्हेन्यू, विरानी औदयोगीक वसाहती जवळ, गोरेगाव (इ), मुंबई-४०००६३.<br>दुरध्वनी क्र ०२०-६९०००६६३<br>फॅक्स क्र. ०२०-३०५६५१४३<br>टोल फ्री क्र १८००२७०००४६२ |
| ५ | बुलडाणा, यवतमाळ, चंद्रपूर, नागपूर, कोल्हापूर<br>(५ जिल्हे) | रिलायंस जनरल इन्शुरन्स कंपनी लि. वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, ५ वा मजला, चिंतामणी अव्हेन्यू, विरानी औदयोगीक वसाहती जवळ, गोरेगाव (इ), मुंबई-४०००६३.<br>दुरध्वनी क्र ०२०-६९०००६६३<br>फॅक्स क्र. ०२०-३०५६५१४३<br>टोल फ्री क्र १८००२७०००४६२ |
| ६ | बीड, अहमदनगर, नाशिक, पुणे, रत्नागिरी (५ जिल्हे) | एच.डी.एफ.सी. इर्गो जनरल इन्शुरन्स कं. लि.,<br>दुरध्वनी क्र ०२०-३०८६२९००<br>फॅक्स क्र. ०२०-३०८६२९५९<br>टोल फ्री क्र. १८००२७००७०० |

केंद्रीय टोल फ्री क्रमांक उपलब्ध न झाल्यास सदर आपत्तीची माहिती बँक / कृषि व महसूल विभाग यांना दयावी तसेच सदर माहिती विमा कंपनीस तात्काळ देण्यात यावी, बँकेमार्फत विमा संरक्षीत बाबी जसे - पीकाचे नाव, विमा संरक्षित रक्कम, भरलेला विमा हप्ता व त्याचा दिनांक या बाबी तपासून विमा कंपनीस पाठविल्या जातील.

**३. नुकसान भरपाई निश्चित करणेसाठी सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे :**

शेतकऱ्याने नुकसान भरपाईचा दावा दाखल करण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह (७/१२, पिकाची नोंद असलेला विमा हप्ता भरल्याचा पुरावा इ.) विमा कंपनीस सादर करणे आवश्यक आहे. शेतकरी परिपुर्ण माहितीसह विहित नमुन्यातील अर्ज सादर करू न शकल्यास उपलब्ध

माहितीच्या आधारे अर्ज सादर करू शकतो, परंतु अर्जातील उर्वरीत माहिती ७ दिवसांच्या आत विमा कंपनीस सादर करणे आवश्यक राहील. पीक नुकसानीचा पुरावा म्हणून घेतलेली छायाचित्रे देता येतील.

४. विमा कंपनीने माहिती प्राप्त झाल्यापासून ४८ तासांच्या आत नुकसानीचे मुल्यांकन निश्चित करण्यासाठी पर्यवेक्षकाची नियुक्ती करावी.

५. पुढील १० दिवसांच्या आतमध्ये नुकसानीचा अहवाल तयार करण्यात यावा.

६. नुकसानीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत नुकसान भरपाई देण्यात यावी.

७. जर बाधित क्षेत्र हे अधिसुचित विमा क्षेत्राच्या २५ टक्के पर्यन्त असेल तर वैयक्तिक स्तरावर पात्र शेतकऱ्यांचे नुकसान ठरविण्यात येईल.

८. जर अधिसुचित पिकाचे बाधीत क्षेत्र हे विमा संरक्षीत क्षेत्राच्या २५ टक्के पेक्षा जास्त असेल तर अधिसुचित क्षेत्रातील सर्व पात्र शेतकरी हे काढणीपश्चात नुकसान भरपाई मिळण्यास पात्र राहतील. विमा कंपनीमार्फत सॅम्पल सर्वेच्या आधारे (संयुक्त समितीने तयार केलेल्या) नुकसानीचे प्रमाण ठरविण्यात येईल.

९. राज्यात महसुल मंडळस्तरावर राज्य शासनामार्फत बसविण्यात आलेल्या पर्जन्यमापकांमधील पर्जन्यमानाच्या नोदींचा वापर काढणी पश्चात नुकसान भरपाई निश्चिती करिता करण्यात येईल.

१०. नुकसानीची पाहणी करण्यासाठी तयार केलेल्या पंचनाम्याच्या प्रपत्राच्या आवश्यक तेवढया प्रती संबंधीत विमा कंपनीने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना उपलब्ध करुन दयाव्यात तसेच शासनाच्या संकेतस्थळावर सुध्दा ही प्रपत्रे उपलब्ध करुन दयावीत.

११. या कार्यपध्दतीस संबंधीत विमा कंपनी मार्फत मोठया प्रमाणावर स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये व इतर प्रसिध्दीमाध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी दयावी. जेणेकरुन याबाबत सर्व विमाधारक शेतकऱ्यांना माहिती मिळेल.

१२. शासन निर्णय क्र प्रपिवियो/प्रक्र९७/११अे, दिनांक ५ जुलै, २०१६ मधील पृष्ठ क्र २२, मुद्दा क्र १४ अन्वये वैयक्तिक स्तरावर पंचनामे करणेसाठी यंत्रणेची नियुक्ती करणेची जबाबदारी जिल्हास्तरावरील जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समन्वय समितीची राहिल.

१३. पंचनामा करण्यास विमा कंपनीचे प्रतिनिधी उपलब्ध न झाल्यास जिल्हास्तरीय समन्वय समितीने नेमलेल्या स्थानिक शासकीय यंत्रणेमार्फत करण्यात आलेला नुकसानीचे पंचनाम्यास मान्यता देणे विमा कंपनीस बंधनकारक राहील.

१४. उपरोक्त प्रमाणे पंचनामा झाल्यास सदर पंचनाम्याची एक प्रत संबधीत विमा कंपनीस पाठवावी व एक प्रत तालुका कृषि अधिकारी कार्यालयाने जतन करुन ठेवावी.

१५. गावनिहाय प्राप्त झालेल्या अर्जाची संक्षिप्त माहिती विमा कंपनीने त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

सोबत : विहित नमुन्यातील नुकसानीची सुचना व पंचनामा प्रपत्र.

कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे

# प्रधानमंत्री पीक विमा योजना (PMFBY)
## पीक नुकसान सूचना फॉर्म

**अधिसुचित पात्र स्थानिक नैसर्गिक आपत्तींमुळे (पुराचे पाणी शेतात शिरुन पिकाचे झालेले नुकसान, गारपीट व भुस्खलन) होणारे पीक नुकसान व काढणी पश्चात नुकसान (चक्रीवादळ व अवकाळी पाऊस यांचे वैयक्तिक पाहणी करिता लागु.)**

विमा धारक शेतक-याची माहिती:-

| | | | |
|---|---|---|---|
| १. विमा धारक शेतक-याचे संपुर्ण नाव | श्री/श्रीमती | | |
| २. पत्र व्यवहाराचा पत्ता | | | |
| ३.फोन/मोबाइल नंबर | | ४.ई मेल आय डी | |

विमा संरक्षित पिकाची माहिती

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| योजना: | प्रधानमंत्री पीक विमा योजना | पीक हंगाम | | वर्ष: | |

१. बँके मार्फत विमा केला असल्यास : १.कर्जदार ☐ २. बिगर कर्जदार ☐ (योग्य पर्यायावर ✓अशी खुण करा)

| | | | |
|---|---|---|---|
| (a).बँक खाते क्रमांक | | (b) बँक नाव व शाखा | |
| (c).विमा हप्ता रक्कम | रु. | (d) विमा हप्ता जमा केल्याचा दिनांक | |

**जर थेट विमा कंपनीमार्फत विमा केला असल्यास.**

(b).**शेतकरी आय डी /विमा प्रस्ताव/कवर नोट क्रमांक :**

**नुकसानग्रस्त शेताची माहिती**

| गाव | महसूल मंडळ | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|
| | | | |

**नुकसानग्रस्त पिकाची माहिती**

| अ.क्र. | सर्वे नंबर | पिकाचे नाव | लागवडीखालील क्षेत्र (हेक्टर) | विमा संरक्षित क्षेत्र (हेक्टर) | अंदाजित नुकसान ग्रस्त क्षेत्र (हेक्टर) | नुकसानीची अंदाजित टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |

पीक नुकसानीच्या बाबींचा तपशील (लागू असेल ते)

| | |
|---|---|
| नुकसानीचे कारण | |
| **दिनांक आणि वेळ** | |
| पीक काढणी दिनांक (काढणी पश्चात नुकसानीकरिता लागू) | |

मी माझ्या नुकसानग्रस्त पीक अथवा त्याचा भाग किंवा त्याची स्थिति पाहणी पूर्ण होण्यापूर्वी बदलणार नाही. कृपया माझ्या शेताची प्रत्यक्ष पाहणी करण्यात यावी. मी जमिनीच्या मालकीचा पुरावा ७ /१२, भाडेपट्टी/ भागधारक करारनामा प्रत व कवर नोट/विमा हप्ता पावती ची प्रत सादर करेन.

**दिनांक -** **विमा धारक शेत*क-याची* सही/अंगठा**

**टिप : १) केवळ योजनेनुसार पात्र अधिसुचित स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले नुकसानीकरिता नुकसान भरपाई मिळण्यासाठी अर्ज सादर करणा-या नुकसानग्रस्त पात्र शेतक-यास भरपाई देण्याचे दायित्व विमा कंपनीवर राहिल.**

**२) नुकसान झाल्यापासून ४८ तासाच्या आत शेतक-याने विमा कंपनीस व बँकेस कळविणे बंधनकारक राहिल.**

**३) तसेच विहित नमुन्यातील वरील प्रपत्र तात्काळ उपलब्ध माहितीच्या आधारे भरुन देऊन उर्वरित माहिती ( राहिली असल्यास) ७ दिवसांच्या आत संबंधीत विमा कंपनीला सादर करणे बंधनकारक आहे.**

---

**पोहोच पावती**

श्री./श्रीमती --------------------------------------- गाव - ---------------- ता. --------------------- जि. ------------------- यांच्या कडुन दि. / / २०१६ रोजी ---:--- वाजता प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत --------------------- मुळे झालेल्या ---------------------- पिकाच्या नुकसानीची सुचना प्राप्त झालेली आहे. प्रत्यक्ष पाहणी करुन पात्रतेनुसार नुकसान भरपाई ठरविण्यात येईल.

**दिनांक :** **सही व शिक्का**
**विमा कंपनी / बँक करीता**

प्रधानमंत्री पीक विमा योजना (PMFBY)

**झालेल्या नुकसानीचा पंचनामा**

1. **पिकाचे नाव: ____________पीक हंगाम: ___________________पीक वर्ष: ___________पंचनाम्याचा दिनांक:_____/_____/२०१६**
2. विमा धारक शेतक-याचे संपुर्ण नाव:-
   श्री/श्रीमती.____________________________________________________________________
3. पत्र व्यवहाराचा पत्ता : गाव - ____________________,तालुका - ___________________जिल्हा :- ___________________
4. संपर्क माहिती: फोन/मोबाइल नंबर -_________________________ई मेल आय डी -__________________________________
5. शेत जमिनीचा तपशील: गाव:- ___________________________ , महसूल मंडळ______________________
   तालुका: _____________________________ जिल्हा: ____________________________राज्य :महाराष्ट्र
6. **(i) जर विमा बँके मार्फत असेल तर : १. कर्जदार ☐ २. बिगर कर्जदार ☐ (योग्य पर्यायावर ✓ अशी खुण करा)**
   बँक खाते क्रमांक :-_________________________ बँक नाव - ____________________शाखा -______________
   विमा संरक्षित रक्कम रु. _______________विमा हप्ता रु. __________________विमा भरल्याचा दिनांक __________________

   **किंवा**

   **(ii) थेट विमा कंपनीमार्फत**
   शेतकरी आयडी /विमा प्रस्ताव पत्रक /कवर नोट क्रमांक.__________________
   विमा संरक्षित रक्कम रुपये. _______________ विमा हप्ता रुपये. ___________विमा हप्ता भरलेचा/पोच दिनांक: _________________
7. **नुकसानग्रस्त विमा संरक्षित पिकाची माहिती :-**

| अनु क्र. | सर्वे नंबर | पिकाचे नाव | लागवडीखालील क्षेत्र (हेक्टर मध्ये) | विमा संरक्षित क्षेत्र (हेक्टर मध्ये) | लागवडीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

8. **स्थानिक आपत्ती / काढणी पश्चात पिकास झालेल्या नुकसानीचे कारण :** ----------------------------------------
9. **नुकसान झाल्याचा दिनांक व वेळ : दिनांक :** ____________________________**वेळ :-**__________________________
10. **संबंधीत विमा कंपनीला नुकसानीबाबत कळविल्याचा दिनांक :** ________________**वेळ :-**______________**विमा कंपनी :**__________
11. **नुकसानीचा तपशील : नुकसानग्रस्त पिकाचे नुकसानीच्या वेळी वय (महिना):** ____________________
12. **पीक काढणी दिनांक (पीक काढणी पश्चात नुकसानीकरिता लागू.)**
13. **नुकसानीच्या वेळी पिकाची परिस्थिती :**

    ________________________________________________________________________________
14. **पिकाच्या नुकसानीबाबत निरीक्षण :**

    ________________________________________________________________________________

    ________________________________________________________________________________

    ______________________________________________________________________
15. **एकूण विमा संरक्षित क्षेत्रापैकी नुकसानग्रस्त क्षेत्राची माहिती :**

| अ क्र | सर्वे क्र | पिकाचे नाव व एकुण लागवडीखालील क्षेत्र | नुकसान ग्रस्त क्षेत्र (हेक्टर मध्ये) | नुकसानीची टक्केवारी (नुकसानग्रस्त क्षेत्र % ) | शेतकरी नुकसानग्रस्त क्षेत्रावरील पीक तसेच ठेवणार आहे काय (होय/नाही) |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

16. **नुकसानी बाबत सलग्न कागदपत्रे** : (लागू असेल ते ✓करा)

| | | |
|---|---|---|
| १. | नुकसान सूचना फॉर्म / विमा हप्ता भरल्याची पोच पावती / पुरावा | ( ) |
| २. | ७/१२ चा उतारा | ( ) |
| ३. | भागधारक/भाडेपट्टी करार नामा प्रत | ( ) |
| ४. | नुकसान ग्रस्त क्षेत्राचा हाताने काढलेला नकाशा - नुकसानग्रस्त क्षेत्र दर्शविणारा | ( ) |
| ५. | नुकसान ग्रस्त क्षेत्राचे फोटो | ( ) |

17. पंच कमिटी सदस्य माहिती : (नाव, हुद्दा, सही)

| नाव | पदनाम | सही व शिक्का |
|---|---|---|
| १. ___________________________________ | गाव कामगार तलाठी | |
| २. ___________________________________ | ग्रामसेवक | |
| ३. __________________________________ | कृषि सहाय्यक | |
| ४. ___________________________________ | विमा कंपनी प्रतिनीधी | |
| ५. ____________________________________ | शेतकरी / शेतकरी प्रतिनीधी | |

**प्रति,**

**१. संबंधीत विमा कंपनी :** ________________________________